॥ दु:ख माझे हें मुकें ॥

गायिका: कृष्णा कल्ले
गीत: वन्दना विटणकर
संगीत: अनिल मोहिले

अंतरंगी रंगलेले गीत झाले पोरके
दु:ख माझे हें मुकें ॥ धृ. ॥

बहरलेल्या मीलनाचे सूर होते लागले
चित्र मोहक नंदनाचें लोचनांनी पाहिले
उघडतां परि नेत्र केवळ भोंवती दाटे धुके ॥ १ ॥

बंध सारे तोडुनी मी घेतली होती उडी
अमृताने नाहली रे उत्सवाची ती घडी
त्या स्मृतीचा कैफ लेवुन आज हंसती हुंदके ॥ २ ॥

तव स्मृतीचा कोष बसला विश्व माझे व्यापुनी
सहज तूं गेलास अदया सर्व धागे तोडुनी
क्षणभरी उमलून विरले स्वप्न नवथर लाडके ॥ ३ ॥

वंचनेची यातना रे दे मला तूं लाखदां
मजवरी केलीस प्रीती सांग हे परि एकदां
क्षण सुखाच्या मोहराचे फिरुन होतिल बोलके ॥ ४ ॥